महाराष्ट्र शासन

# शासकीय विधी महाविद्यालय

ए रोड, चर्चगेट, मुंबई 400 020
(स्थापना 1855)

**दूरध्वनी क्रमांक** 022-22041707 **फॅक्स** 022-22041708

क्रमांक: शाविम/आस्था/2017-18/32 दिनांक-04/01/2018

## सुचना

महाविद्यालयातील साहित्यांचे निर्लेखन करण्यासाठी मा. प्राचार्यांच्या आदेशान्वये मोहोरबंद निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्यानुसार ईच्छुक निविदाधारकांना महाविद्यालयातील तळमजल्यावरील सभागृहामध्ये एकत्रिक करुन ठेवलेले साहित्याची प्रत्यक्ष पाहणी करण्यासाठी बोलावण्यात आले होते.सदरच्या निविदाधारकांनी साहित्यांची प्रत्यक्ष पाहणी केल्यानंतर महाविद्यालयात सतरा निविदा प्राप्त झाल्या होत्या. सदर निविदा दिनांक 03/01/2017 रोजी प्राचार्यांच्या दालनात निर्लेखन समिती सभासदांच्या आणि सना स्क्रॅप ट्रेडर्स या निविदाधारकाच्या उपस्थितीत मोहोरबंद निविदा उघडण्यात आल्या.

उपरोक्त निविदांमध्ये किताबुल्लाह मुशाहिदी या कंपनीने दरपत्रकातील दर्शविलेले दर इतर कंपनीच्या दरपत्रकांच्या तुलनेत सर्वाधीक आहे. सदर मा.प्राचार्य आणि निर्लेखन समितीच्या सभासदांनी सर्वानुमते असा निर्णय घेतला की श्री. प्रविण यांनी दुरध्वनीद्वारे किताबुल्लाह मुशाहिदी कंपनीस संपर्क साधुन त्यांच्या कंपनीस निर्लेखन साहित्य घेवून जाण्याचे आदेश ठरविण्यात आले असून त्याबाबत त्यांना कळविण्यात यावे.

वरील नमुद केल्यानुसार किताबुल्लाह मुशाहिदी यांच्याशी दि.03/01/2017 रोजी दुरध्वनीद्वारे संपर्क साधला असता त्यांनी दि.04/01/2018 रोजी सकाळी 11 वाजता हजर होतो. परंतू त्यांनी सांगीतलेल्या वेळेमध्ये महाविद्यालयात उपस्थिती नव्हती. सदर किताबुल्लाह मुशाहिदी यांच्याशी परत संपर्क साधला असता त्यांनी महाविद्यालयात दुपारी 3.00 वाजेपर्यंत हजर होतो असे सांगीतले. परंतू तेव्हाही ते महाविद्यालयात उपस्थित नव्हते. त्याच्यानंतर किताबुल्लाह मुशाहिदी यांच्याशी महाविद्यालयाच्या दुरध्वनीद्वारे 3 वेळा तसेच वैयक्तिक भ्रमणध्वनीद्वारे 2 वेळा संपर्क साधला असता त्यांनी कोणताही प्रतीसाद दिला नाही.

उपरोक्त तपशिलान्वये किताबुल्लाह मुशाहिदी यांना अशी ताकीद देण्यात येत आहे की त्यांनी दि.05/01/2018 रोजी महाविद्यालयील वेळेमध्ये संबंधीत कामाचा आदेश घेवून पुढील कार्यवाही तात्काळ करावी. अन्यथा आपले दरपत्रक रद्य करून पुढील योग्य ती कार्यवाही महाविद्यालय करेल याची नोंद घ्यावी.

प्राचार्य
प्राचार्य
शासकीय विधी महाविद्यालय
'अे' मार्ग, चर्चगेट, मुंबई-२०